Ajay J. Bramhecha
Chairman

Vaishali S. Awade
Vice Chairperson

Prasad V. Patil
Chief Executive & Secretary

**The Maharashtra Urban Co-op. Banks' Federation Ltd.**
(Regd. No. BOM-GNL-8 of 9th March, 1979)
Bhartiya Krida Mandir, 4th Floor,
Wadala, Mumbai – 400031
Tel No.: 022-24135797/24151185
E-mail: admin@mucbf.com
Website: www.mucbf.com

2025
International Year of Cooperatives

जा.क्र.४३०/विशेष सर्वसाधारण सभा/२०२५-२६ दि. २२ डिसेंबर, २०२५

प्रति,

मा. अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व नागरी सहकारी बँका व
बँकांची जिल्हा/ विभागीय असोसिएशन्स

**विषय: बँकिंग रेग्युलेशन (सुधारणा) अधिनियम, २०२५ संदर्भात विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन**

महोदय,

दि. १५ एप्रिल, २०२५ रोजी लागू करण्यात आलेल्या बँकिंग रेग्युलेशन (सुधारणा) अधिनियम २०२५ तसेच दि. १० डिसेंबर, २०२५ रोजी मा. वित्त मंत्रालयाच्या राजपत्राद्वारे संचालकांना अपात्र ठरविण्याबाबत निश्चित करण्यात आलेल्या प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात तीव्र चिंता व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर, या विषयावर सखोल चर्चा करुन एकत्रित भूमिका ठरविण्याच्या उद्देशाने फेडरेशनची विशेष सर्वसाधारण सभा **दि. ०३ जानेवारी, २०२६** रोजी आयोजित करण्यात आली आहे.

विशेषत: दि. १५ एप्रिल, २०२५ च्या सुधारणेनुसार नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा १० वर्षांचा कालावधी पूर्ण केलेल्या संचालकांना त्यानंतर संचालक म्हणून काम करता येणार नाही. नागरी सहकारी बँकांची रचना, स्थानिक स्वरूप, व लोकशाही पद्धतीने निवडून आलेले व्यवस्थापन लक्षात घेता, अशा सक्तीच्या तरतुदीमुळे बँकांच्या प्रशासनात्मक सातत्यावर, धोरणात्मक निर्णयक्षमतेवर व संस्थात्मक स्थैर्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची दाट शक्यता आहे.

तसेच दि. १० डिसेंबर, २०२५ च्या राजपत्राद्वारे संचालकांना अपात्र ठरविण्याबाबत निश्चित करण्यात आलेल्या प्रक्रियेमुळे अनेक संचालकांच्या मनात कायदेशीर, प्रशासकीय व व्यावहारिक स्वरूपाचे विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. सदर प्रक्रिया नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांशी सुसंगत आहे काय, संचालकांना पुरेशी सुनावणी व संधी मिळेल काय, तसेच तिचा गैरवापर होण्याची शक्यता टाळण्यासाठी पुरेशे संरक्षणात्मक तरतुदी आहेत काय, याबाबत गंभीर शंका उपस्थित होत आहेत.

वरील दोन्ही सुधारणा एकत्रितपणे विचारात घेतल्यास, नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रावर अनावश्यक प्रशासकीय ताण, नेतृत्त्वाचा अभाव व निवडणूक प्रक्रियेत अस्थिरता निर्माण होण्याची परिस्थिती उद्भवू शकते. त्यामुळे आवश्यक असल्यास या तरतुदींना फेडरेशनच्या माध्यमातून मा. उच्च न्यायालय तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचा पर्याय खुला ठेवणे अपरिहार्य ठरू शकते.

या पार्श्वभूमीवर, वरील दोन्ही मुद्दयांवर सर्व सभासद बँकांनी एकत्र येऊन आपापले विचार मांडणे, या सुधारणांना एकत्रितपणे विरोध दर्शवण्याची भूमिका ठरविणे तसेच त्याबाबत करावयाची पुढील कार्यवाही व दिशा निश्चित करणे अत्यावश्यक आहे.

THE MAHARASHTRA URBAN CO-OP. BANKS' FEDERATION LTD. ★ Mumbai

त्यासाठी फेडरेशनच्या सर्व सभासद बँकांचे अध्यक्ष/कार्यकारी संचालक/संचालक यांना फेडरेशनच्या विशेष सर्वसाधारण सभेस आमंत्रित करण्यात येत आहे. सदर सभेची मिटिंग नोटीस या पत्रासोबत संलग्न करण्यात आलेली आहे. तरी या अत्यंत महत्वाच्या विषयावर आपले मौल्यवान विचार मांडण्यासाठी आपण सदर सभेस आवर्जून उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

THE MAHARASHTRA URBAN CO-OP. BANKS' FEDERATION LTD. ★ Mumbai

(अजय ब्रम्हेचा)
अध्यक्ष